Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 05 October 2024

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: ०५ ऑक्टोबर २०२४ सकाळी ११.०० वाजता.**

****

वाशिम दौऱ्यासाठी पंतप्रधानांचं आज सकाळी सव्वादहाच्या सुमारास नांदेड इथल्या श्री गुरूगोविंदसिंगजी विमानतळावर आगमन झालं. त्यानंतर तिथून ते विशेष हेलिकॅप्टरने पोहरादेवीकडे रवाना झाले. यावेळी भाजप नेते तथा माजी मुख्यमंत्री खासदार अशोक चव्हाण, खासदार अजित गोपछडे तसंच माजी खासदार प्रतापराव चिखलीकर, पोलिस महासंचालक बिपीन कुमार सिंग आदींसह जिल्हा प्रशासनाच्या वतीनं स्थानिक नेत्यांनी त्यांचं विमानतळावर स्वागत करण्यात आलं.

****

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर लोकसभेचे विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस खासदार राहुल गांधी आज सकाळी कोल्हापूर दौऱ्यावर आले आहेत. राहुल गांधी यांचा कोल्हापूर दौरा कालच नियोजित होता मात्र विमानात झालेल्या बिघाडामुळं ते काल येऊ शकले नाहीत.

****

महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मुंबई ,नाफेड आणि एन सी सी एफ मुंबई यांच्या संयुक्त विद्यमानं २०२४–२५ या वर्षात, केंद्र शासनानं निश्चित केलेल्या आधारभूत दरानुसार राज्यात मुग, उडीद आणि सोयाबीन खरेदीकरीता शेतकरी नोंदणी गेल्या एक तारखेपासून पासून सुरु करण्यात आली आहे मात्र, प्रत्यक्षात मुग, उडीद खरेदी येत्या १० तारखेपासून तर सोयाबीन खरेदी येत्या १५ तारखेपासून पासून सुरु करण्यात येणार आहे.

दरम्यान, शेतकऱ्यांना छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या ११, बीड – १६, धाराशिव – १५, जालना – ११, लातुर – १४, परभणी – ८, हिंगोली – ९, तर नांदेड जिल्ह्यातल्या १४ केंद्रांवर नोंदणी करता येणार आहे. मुगाचा हमीभाव ८ हजार ६६२ रुपये प्रति क्विंटल उडीदाचा ७ हजार ४०० रुपये प्रति क्विंटल तर सोयाबीनचा हमीभाव

४ हजार ८९२ रुपये प्रतिक्विंटल इतका निश्चित करण्यात आला असून शेतकऱ्यांनी आपली नोंदणी करुन घ्यावी असं, आवाहन पणन महासंघानं केलं आहे.

****

हरियाणा इथं विधानसभा निवडणुकीच्या सर्व ९० जागांसाठी आज एकाच टप्प्यात मतदान होत आहे. सकाळी ७ वाजता मतदान प्रक्रिया सुरु झाली असून ती सायंकाळी ६ वाजेपर्यंत चालेल. २ कोटी ३ लाखांहून अधिक मतदार १ हजार ३१ उमेदवारांचं भवितव्य मतपेटीत बंद होणार आहे. आज सकाळी ९ वाजेपर्यंत हरियाणात सरासरी १० टक्के मतदान झालं आहे. दरम्यान, हरियाणातील मतदारांनी, विशेषत: युवा वर्गानं अधिकाधिक संख्येनं आपला पहिला मतदानाचा हक्क आवर्जुन बजावावा. असं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एका समाज माध्यमावरील आपल्या संदेशाद्वारे केलं आहे.

****

नंदुरबार जिल्ह्यातल्या नवापूर तालुक्यातील खोकसा गाव परिसरात काल रात्री पुन्हा एकादा भुकंपाचा सौम्य हादरा बसला. गुजरातमधल्या गांधीनगरच्या भुकंपमापक यंत्रात दोन पूर्णांक दोन रिश्टर स्केल इतकी भुकंपाची तिव्रता नोंदवली गेली असून यामुळं परिसरातील ग्रामस्थांमध्ये चिंता वाढली. या परिसरात येणारा आवाज आणि त्यातून जमीनीत कंपने निर्माण होत असल्यानं गावकरी मात्र रस्त्यावर आणि सुरक्षितस्थळी रात्र जागून काढत आहेत.

****

मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियानाअंतर्गत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांचा सन्मान आणि राज्यस्तरीय विविध योजनांचा लोकार्पण सोहळा उद्या रविवारी छत्रपती संभाजीनगर इथं होणार आहे. शहरातल्या खडकेश्वर परिसरातील मराठवाडा सांस्कृतिक मंडळ मैदानावर दुपारी दीड वाजता हा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, पालकमंत्री अब्दुल सत्तार, यांच्यासह गृहनिर्माण मंत्री अतुल सावे, महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे, कृषी मंत्री धनंजय मुंडे, शहर आणि औद्योगिक विकास महामंडळाचे अध्यक्ष संजय शिरसाट, विधान परिषदेतील विरोधीपक्षनेता आमदार अंबादास दानवे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

****

सध्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून जे द्यायचे नाही, त्याची घोषणा करायचा प्रकार महायुती सरकारनं सुरू केला आहे. रिझर्व्ह बँकेकडून अतिरिक्त सव्वालाख कोटींची

कर्ज मागणी राज्य सरकारनं केली आहे. या घोषणांसाठी त्यांना आठवड्याला पाच ते सहा हजार कोटी खर्च करायचे आहेत. यातून राज्याची नेमकी आर्थिक परिस्थिती लक्षात येत आहे, अशी टीका  राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केली आहे. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाची शिवस्वराज्य यात्रा काल साताऱ्यात दाखल झाली, त्यावेळी प्रसारमाध्यमांशी ते बोलत होते.

दरम्यान, येत्या सात ऑक्टोबरला सकाळी दहा वाजता इंदापुरात खासदार शरद पवारांच्या प्रमुख उपस्थितीत भाजपचे नेते हर्षवर्धन पाटील यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश होणार आहे. राज्यस्तरावर काम करणारा नेता आमच्या पक्षात येतोय, याचा विशेष आनंद आहे, असं जयंत पाटील म्हणाले.

****